# माहिती पत्रक - फक्त नवीन पेशंट्ससाठी

पहिल्यांदा डॉ.निकम यांचा सल्ला व औषध घेण्यासाठी खाली दिल्याप्रमाणे पद्धत आहे...

स्वतः डॉ.निकम रात्री १०:०० नंतरच नवीन पेशंट तपासायला सुरवात करतात. कृपया कोणत्याही परिस्थितीत दिवसा तपासणी करण्यासाठी विनंती / आग्रह करू नये. फक्त अत्यंत गंभीर रूग्णाला ताबडतोब ॲडमिट करून तपासून औषध दिले जाते.

पहिल्यावेळी अत्यंत विचारपूर्वक, पूर्ण वेळ देऊन, सर्व माहिती घेऊन हजारो औषधांमधून एकच योग्य औषध व त्याची शक्ती ठरवावी लागते. हे अत्यंत महत्वाचे काम आहे आणि पेशंटच्या दृष्टीने जीवन-मरणाबाबत निर्णायक ठरणारी गोष्ट आहे.

दिवसाची वेळ नवीन पेशंटची फक्त केस हिस्ट्री, जुन्या पेशंट्सना सल्ला व औषध आणि ॲडमिट पेशंट्सना औषध, सल्ला, रिपोर्ट्स यासाठीच आहे. दिवसा सतत येणारे फोन, भेटावयास येणारे व्हि.आय.पी. व इतर कार्यालयीन कामे यामुळे सारखी गडबड असते.

त्यामुळे सर रात्री ११:०० नंतरच नवीन पेशंट्सला तपासून औषध देतात. तरी कृपया दिवसा औषध देण्यासाठी नवीन पेशंट्स व त्याच्या नातेवाईकांनी बिलकुल आग्रह करू नये.

सर स्वतः रोज रात्री पहाटेपर्यंत सर्व पेशंट्स संपेपर्यंत जागरण करतात. आपण एक दिवस कळ सोसून त्यांना उत्तम औषध ठरवण्यासाठी योग्य व पुरेसे सहकार्य करूया.

नवीन पेशंटची पूर्ण केस हिस्ट्री दिवसा प्रथम असिस्टंट डॉक्टर घेतात. आपले नाव व इतर माहिती काऊंटरवर देऊन ` ५०० भरून असिस्टंट डॉक्टर बोलावतील तेंव्हा पूर्ण केस हिस्ट्री द्यावी.

रात्री १०:३० नंतर दिवसभरात झालेल्या सर्व केस हिस्ट्री अभ्यासून पेशंटला होणाऱ्या त्रासाची तीव्रता व उपचाराची निकड यावरून स्वतः डॉ.निकमच सर्व नवीन पेशंटचे नंबर ठरवतात, तरी कृपया रात्री ०८:३० ते ०९:०० या वेळेत फोन करून आपला नंबर व साधारण वेळ विचारून घ्यावी.

केस हिस्ट्री झाल्यावर हॉस्पिटलच्या आवारात शक्यतो थांबू नये. फक्त जुन्या पेशंट्स्ला दुस–या वेळेपासून दुपारी २:०० ते ९:०० या वेळेत सर औषध व सल्ला देतात. त्यामुळे आपली केस हिस्ट्री झाल्यावर विश्रांती घेऊन रात्री ११:०० नंतरच हॉस्पिटलमध्ये यावे.

लांबच्या पेशंट्ससाठी विश्रांती व सामान ठेवण्यासाठी जवळच सोय केलेली आहे. कृपया साठे सरांना nitin.sathe@ahhhc.com या मेल-आयडी वर ई-मेल करून जागा उपलब्धतेची चौकशी करावी. तेथे सर्व सोयींनी सुसज्ज असे अपार्टमेंट आहे. त्यामध्ये 2 बेडरूम, हॉल, किचन, डायनिंग रूम, 2 टॉयलेट्स (एकामध्ये कमोड ची सोय आहे) अशी रचना आहे. घरामध्ये गॅस, स्वयंपाकाची सोय, टि.व्ही., फ्रिज, वॉशिंग मशिन व शुद्ध पाणी या सोयी आहेत. ही जागा अत्यंत चांगल्या वस्तीत व सुरक्षित आहे. येथून आपण रात्रीसुद्धा 3-4 मिनीटांत पायी येऊ-जाऊ शकता.

हॉस्पिटलच्या जवळ इतरत्र हॉटेल, लॉजची सोय नाही. परंतु, पुणे-मुंबई महामार्ग नं.४ येथील पिंपरी चौकाजवळ ३-४ मध्यम , उत्तम हॉटेल, लॉज आहेत. तेथे मुक्कामाची सोय होऊ शकते. कृपया दराबाबत थेट तेथेच चौकशी करावी.

हॉटेल विक्रांत, विशाल थिएटर समोर ( 020-27420721, 27426494), हॉटेल रॉक्सी, हॉटेल जिंजर, हॉटेल सायट्रस.

तेथून रात्री हॉस्पिटलमध्ये येण्यासाठी वाहनाची सोय स्वतः करावी लागेल.

हॉस्पिटलचा पत्ता :

आदित्य होमिओपॅथीक हॉस्पिटल आणि हिलींग सेंटर
तपोवन मंदिराजवळ, ‘मोअर सुपर मार्केट’ समोर,
पिंपरी गांव, पुणे - 411 017, महाराष्ट्र.
फोन नं. : 020-27412549, 27412197
मोबाईल नं. : 09921502900